// सा विद्या या विमुक्तये //

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

**"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)**

**Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade**

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325

Website : srtmun.ac.in
e-mail aff.srtmun@gmail.com

शिक्षण व शारीरीक शिक्षण या महाविद्यालयांचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करुन घेणेबाबत.

### :: परिपत्रक ::

संदर्भ :– ०१. मा. गंगाधार दाते, प्र.सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांचे पत्र क्र. शिशुस/शिक्षण शुल्क/कार्यवाही/२०२२–२३/२०२२/०१, दि. ०२.०१.२०२३.

०२. मा. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांचे पत्र क्र. शिशुस/शिक्षण शुल्क/कार्यवाही/२०२२–२३/२०२३/३९, दि. ०८.०२.२०२३.

मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत शिक्षण व शारीरीक शिक्षण महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) एकदाही झाल्याचे दिसून येत नाही.

याबाबत शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करुन घेण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये महाराष्ट्र शासनाने निर्णय निर्गमीत केलेले आहेत. त्यानुसार महाविद्यालयांनी शैक्षणिक अंकेक्षण (Acaemic Audit) प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे मापदंड असून शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा धारण करणेसाठी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११७ (२) अन्वये प्रत्येक तीन वर्षातून किमान एकदा महाविद्यालयाचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करुन घेणे बंधनकारक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची (National Education Policy) प्रभावी अमंलबजावणी करण्याच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर बहुउद्देशाखीय शिक्षण, कौशल्य आधारीत अभ्यासक्रम, परिक्षा मुल्यमापन, अध्ययन, अध्यापन स्वायत्तता इत्यादी बाबत अमुलाग्र बदल होऊ घातलेले आहेत. पुढील वाटचालीच्या दृष्टीने आपणास तात्काळ शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) पुर्ण

करुन महाविद्यालयाचा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे. अन्यथा विद्यापीठ स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कृपया याची नोंद घ्यावी.

करिता आपल्या स्तरावरुन तात्काळ शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांना सादर करावा. व त्याची एक प्रत या विभागास सादर करण्यात यावी.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२२–२०२३/1426
दिनांक :– १६.०२.२०२३

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे–०१.
२. मा. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई–३२.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत शिक्षण व शारीरीक शिक्षण महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.